220

101 58

शासकीय जमिनीवरील कांदळवन क्षेत्रास 'राखीव वने'
म्हणून अधिसूचित करण्याबाबत.

महाराष्ट्र शासन,
महसूल व वन विभाग,
शासन आदेश क्रमांक : एस-१०/२०१३/प्र.क्र.१४/फ-३,
मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२.
दिनांक : २१ जून, २०१३.

वाचा :-

शासन निर्णय क्रमांक : एस-१०/२०१३/प्र.क्र.१४/फ-३, दिनांक २५.६.२०१३.

रिट याचिका क्र. ३२४६/२००४ मध्ये मा.मुंबई उच्च न्यायालयाने दिनांक ६.१०.२००५ च्या आदेशानुसार राज्यातील कांदळवनाचे व्यवस्थापन, संरक्षण व संवर्धनासाठी प्रभावी पाऊले उचलण्याचे निदेश दिले होते. त्यानुषंगाने शासकीय जमिनीवरील कांदळवन क्षेत्रास भारतीय वन अधिनियम, १९२७ अनुसार संरक्षित वन म्हणून अधिसूचित करण्याबाबतची प्रक्रिया सुरु आहे.

२. राज्यात कांदळवन क्षेत्राची व्याप्ती, कांदळवनांचे पर्यावरणीय महत्व, सुनामी, क्यान तसेच चक्रीवादळ सारख्या नैसर्गिक आपत्तीपासून बचाव करण्यासंदर्भात कांदळवनाचे महत्व इत्यादी विचारात घेता, शासकीय जमिनीवरील कांदळवन क्षेत्रास पुरेसे वैधानिक संरक्षण प्रदान करण्याच्या दृष्टीने त्यास राखीव वने म्हणून गठीत करण्याबाबत उक्त नमूद शासन निर्णय निर्गमित करण्यात आलेला आहे. त्यास अनुलक्षून पुढील प्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

## आदेश

अ. आतापर्यंत संरक्षित वन म्हणून अधिसूचित झालेल्या सर्व कांदळवन क्षेत्रास राखीव वने म्हणून गठीत करण्याच्या दृष्टीने भारतीय वन अधिनियम, १९२७ च्या कलम ४ अनुसार अधिसूचना निर्गमित करावी.

ब. संरक्षित वनक्षेत्रास भारतीय वन अधिनियम, १९२७ च्या कलम ४ अनुसार अधिसूचित करण्याकरिता आवश्यक प्रारुप शासन परिपत्रक क्र.एफएलडी-१२/२०११/प्र.क्र.४१२/फ-३, दिनांक २९ मार्च, २०१२ अन्वये विहित करण्यात आलेला असुन (प्रत संलग्न) त्यानुसार अधिसूचना निर्गमित होतील, याची दक्षता घ्यावी.

क. यापुढे शासकीय जमिनीवरील कांदळवन क्षेत्रास संरक्षित वनाऐवजी 'राखीव वने' म्हणून अधिसूचित करण्याबाबतचे प्रस्ताव शासनास सादर होतील, याची दक्षता घ्यावी.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांचे आदेशानुसार व नावाने.

५८८

(प्रवीण परदेशी)
प्रधान सचिव (वने)

प्रति,

विभागीय आयुक्त, कोकण विभाग, कोकण भवन, नवी मुंबई.
विभागीय आयुक्त, पुणे विभाग, पुणे.

(पु.बा.प.)